# उपविभागीय अधिकारी (महसूल) कार्यालय, कणकवली,सिंधुदुर्ग



महसूल सप्ताह निमित्त गाव मौजे शिरगांव येथील स.क्र. 195/37 शासकीय पाणंदच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आले 🌱 🌱



महसूल सप्ताह निमित्त मंडळ बापर्डे, तालुका देवगड येथे मा. तहससिलदार श्री. पवार साहेब यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



महसूल सप्ताह निमित्त गाव मौजे नांदगाव येथे मंडळ अधिकारी कार्यालय नांदगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र नांदगाव नजीकच्या पाणंद रस्ता लगत मोकळ्या जागेत वृक्षारोपण करण्यात आले.



महसूल सप्ताह निमित् पडेल मंडळातर्फे विजयदुर्ग येथे मा.नायब तहससिलदार श्री. शेट साहेब यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले त्यावेळी उपस्थिती मंडळ अधिकारी व मंडळातील तलाठी उपस्थित होते....*





आज दि. 03/08/2025 रोजी सजा वळीवंडे मधील वळीवंडे देसाईवाडी येथे महसूल सप्ताह निमित्त मंडळ अधिकारी तळवडे यांच्या उपस्थितीत पाणंद रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण केले



महसूल सप्ताह निमित्त गाव नापणे येथे कोकाटेवाडी येथील पाणंद चे बाजूला झाडे लावण्याचा कार्यक्रम दिनांक 3 /8/ 20250 रोजी घेण्यात आला त्यावेळी सदर वाडीतील ग्रामस्थ उपस्थित होते तसेच मंडळातील ग्राम महसूल अधिकारी हे देखील उपस्थित होते



गाव मौजे हरकूळ बु. ता. कणकवली येथे पाणंद रस्ता वृक्षारोपण कार्यक्रम मा. यादव रावसाहेब निवासी नायब तहसिलदार तसेच कणकवली मंडळातील ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक, पोलीस पाटील,ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.





वैभववाडी मंडळातर्फे वृक्षारोपण करणेत आले त्यावेळी उपस्थित ग्राम महसूल अधिकारी, कोतवाल कर्मचारी.




मौजे दाभोळे, मंडळ- देवगड, महसूल सप्ताह निमित्ताने पाणंद च्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आले.



हुंबरट मंडळ अंतर्गत गाव -जानवली येथे वृक्षारोपण केले.



गाव मौजे शास्त्रीनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत पाणंद रस्ता येथे वृक्षारोपण केले.



गाव मौजे शिडवणे येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत आज रोजी श्री रवळनाथ मंदिर शेजारी पाणंद रस्ता येथे वृक्षारोपण सरपंच शिडवणे व ग्रामस्थ तसेच खारेपाटण मंडळ यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

# ❑ महसूल सप्ताह दिवस 4 ऑगस्ट छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान -:



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत मंडळ - बापर्डे सजा मुटाट पाळेकरवाडी येथे उपन्न दाखले, नॉन क्रिमीलेअर, जातीचे दाखले , वितरण व वारस तपास अर्ज स्वीकारले तसेच agristak जनजागृती केली यांस उपस्थित मंडळ अधिकारी मा. शेट्ये भाऊसाहेब माजी सभापती रवी पाळेकर सरपंच उदय पाळेकर ग्राम महसूल अधिकारी नागटिळक महसूल सेवक गुरू परब महा इ सेवा केंद्र सुफल यांसह आदी नागरिकांच्या उपस्थितीत साजरी केला.



महसूल सप्ताह चा चौथा दिवस या निमित्ताने मंडळ अधिकारी कार्यालय तळेरे येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान कार्यक्रम राबवण्यात आला सदर कार्यक्रमात मा. तहसीलदार साहेब कणकवली यांचेकडून प्राप्त झालेले 155 चे दुरुस्तीचे आदेश संबंधितांना वाटप करण्यात आले त्याचप्रमाणे उत्पन्न दाखले नॉन क्रिमिलर दाखले, श्रावणबाळ योजनेचे मंजूर झालेले दाखले, निर्णित केलेल्या नोंदींचे खातेदारांना 7/12, फेरफार व 8 अ वाटप करण्यात आले.



महसूल सप्ताह अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान मोहीम अंतर्गत मंडळ अधिकारी कार्यालय नांदगाव येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदरील कार्यक्रमारीता प्रमुख पाहुणे नांदगावचे मा.सरपंच ह्यांच्या  उपस्थितीत कार्यक्रमामध्ये  ७/१२, फेरफार वाटप, उत्पन्न दाखला वाटप, रहिवासी प्रमाणपत्र आणि शासकीय योजनाकरिता सत्यापन Application वरील हयात प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम संपन्न झाला.



वैभववाडी तालुक्यातील मंडळ कुसुर चे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान ग्रामपंचायत उंबर्डे येथील हॉलमध्ये घेण्यात आले सदर अभियानांतर्गत विविध दाखले वाटप तसेच जीवन सातबारा मधील सातबारा वाटप करण्यात आले सदर कार्यक्रमासाठी माननीय निकम रावसाहेब यांनी मार्गदर्शन केले सदर अभियान अंतर्गत जीवन सातबारा तसेच ॲग्रीस्टॅक योजना ई पिक पाहणी योजना बेनीफिसरी सत्यापन ॲप बाबत उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले



महसूल सप्ताह अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान मोहीम अंतर्गत ग्रामपंचायत  कार्यालय हळवल येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संजय गांधी योजनेचे प्रमाणपत्र, ७/१२, फेरफार वाटप, उत्पन्न दाखला वाटप, रहिवासी प्रमाणपत्र आणि शासकीय योजनाकरिता सत्यापन Application वरील हयात प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम संपन्न झाला.



ग्रामपंचायत कुणकेश्वर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराज अभियान अंतर्गत दाखले उत्पन्न दाखले वाटप,वारस तपास, अ पा क नोदी कमी करणे इत्यादी अज स्विकारले. तसेच agristack बाबत माहिती देण्यात आली.शासनाचे वेगवेगळे सेवा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान मंडळ - फोंडाघाट अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय फोंडाघाट येथील सभागृहामध्ये कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमांतर्गत संजय गांधी योजनाचे 4 लाभार्थी यांना लाभ मंजूर झाल्याबाबत संबंधित लाभार्थी यांना मा. तहसीलदार साहेब कणकवली यांचेकडील मंजूर लाभ आदेशाच्या प्रति वितरित करण्यात आल्या. तसेच संजय गांधी योजनेच्या 4 लाभार्थ्यांना सत्यापण सर्टिफिकेटचे वितरण करण्यात आलं. एका रेशन कार्डचे वितरण करण्यात आलं त्याचप्रमाणे 4 खातेदार यांना सातबाराचे वाटप करण्यात आलं. सदर राजस्व अभियानांतर्गत विविध दाखल्याचे वितरण करण्यात आले त्यामध्ये उपन्न दाखले -7, वय अधिवास -2, जातीचे प्रमाणपत्र -1 तसेच वारस तपासबाबतचा आलेला 1 अर्ज स्वीकारला.



महसूल सप्ताह दिवस 4 ऑगस्ट छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत मंडळ - तळवडे सजा तळवडे येथे उपन्न दाखले, जातीचे दाखले , तसेच agristak जनजागृती केली यांस उपस्थित मंडळ अधिकारी श्री निगरे sir,  ग्राम महसूल अधिकारी  सातारकर भाऊसाहेब, पाटील भाऊसाहेब, राठोड मॅडम,महा इ सेवा केंद्र संचालक सनीये यांसह आदी नागरिकांच्या उपस्थितीत साजरी केली..





छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान मोहीम मंडळ खारेपाटणचा ग्रामपंचायत खारेपाटण येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला सदर कार्यक्रमास मा. सरपंच खारेपाटण, मा. सरपंच कुरंगवणे, बेरले तसेच चिंचवली शाळा नंबर 1 चे मुख्याध्यापक श्री गायकवाड सर यांच्या उपस्थितीत सातबारा फेरफार वाटप , जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, शासकीय योजनांकरिता सत्यापन ॲप द्वारे हयात प्रमाणपत्र तसेच कृषी कार्यालयाकडून फवारणी यंत्र मंजुरी प्रमाणपत्र, ग्रास कटर मंजुरी प्रमाणपत्र वाटप करण्यात आले तसेच सत्यापण ॲपची माहिती देण्यात आली, संजय गांधी लाभार्थी मंजुरी प्रमाणपत्र वाटप करण्यात आले



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान मंडळ - सांगवे अंतर्गत समाधी पुरूष हितचिंतक मंडळ सांगवे येथील सभागृहामध्ये कार्यक्रम संपन्न झाला. सदर राजस्व अभियानांतर्गत विविध दाखल्याचे वितरण करण्यात आले त्यामध्ये उपन्न दाखले -2, वारस तपासबाबतचा आलेला 1 अर्ज स्वीकारला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान सांगवे ग्रामपंचायतचे सरपंच मा.श्री.संजय सावंत यांनी स्वीकारला तसेच या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती समाधी पुरूष हितचिंतक मंडळ अध्यक्ष विद्याधन सावंत मा.श्री.विजय वरक रावसाहेब नायब तहसीलदार (निवडणूक) तहसील कार्यालय कणकवली हे उपस्थित होते तसेच सांगवे मंडळ अधिकारी श्रीम.बी.के.फर्नांडीस उपस्थित होते.



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत वाभवे मंडळ याठिकाणी कार्यक्रम घेणेत आला सदर कार्यक्रमास मा. तहसीलदार साहेब यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले तसेच विविध दाखले यांचे वाटप केले.तसेच शासनाचे विविध सेवा या बाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत एडगाव मंडळ या ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आला सदर कार्यक्रमास मा श्री एस.एस.सुतार नायब तहसीलदार (निवडणूक) उपस्थित राहून मार्गदर्शन केले. तसेच विविध दाखले वाटप करण्यात आले.








महसूल सप्ताह निमित्त मंडळ अधिकारी कार्यालय पडेल येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत दाखले वाटप व इतर महसूल खात्यातील कामासंदर्भात कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमात जातीचे दाखले, वय व अधिवास दाखले, सातबारा, फेरफार वितरित करण्यात आले. त्याचप्रमाणे खातेदारांकडून वारस तपासाबाबतचे अर्ज व इतर अर्ज स्वीकारण्यात आले. सदर कार्यक्रमास आलेल्या ग्रामस्थांना पीक पाहणी व अ‍ॅग्रीस्टॅक याबाबत माहिती देण्यात आली.लाभार्थी यांचे DLC करण्यात आले.

मंडळ अधिकारी कार्यालय हुंबरट ता.कणकवली येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत विविध दाखले वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. 1.सातबारा/8अ,फेरफार - 522.उत्पन्न दाखले चौकशी अर्ज-53.संजय गांधी /श्रावणबाळ योजना अंतर्गत अर्ज-14.वारस अर्ज-65.कलम 155 अंतर्गत अर्ज -02

कणकवली तालुक्यातील कणकवली येथे मंडळ कणकवली यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज "महाराजस्व अभियान" राबविण्यात आले. राज्याच्या महसूल योजनांची माहिती यामध्ये नागरिकांना देण्यात आली. यानिमित्ताने ग्राम महसूल अधिकारी व महसूल कर्मचाऱ्यांकडून ७/१२ उतारे, फेरफार, Ews प्रमाणपत्र वाटप, संजय गांधी योजनेतील लाभार्थ्यांच्या दाखल्यांचे वाटप, अ‍ॅग्री स्टॅक ओळखपत्र तयार करणे तसेच विविध महसूल योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली.







मंडळ भुईबावडा येथे "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान "ग्रामपंचायत भुईबावडा येथील सभागृहामध्ये घेण्यात आले.सदर अभियानांतर्गत विविध दाखले वाटप तसेच जीवंत सातबारा मधील सातबारा वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी मा. श्री.पाटील रावसाहेब, श्री. नागावकर भाऊसाहेब उपस्थित होते. सदर मान्यवरांनी उपस्थित लाभार्थी, खातेदार, ग्रामस्थ यांना सदर अभियान अंतर्गत जीवंत सातबारा तसेच ॲग्रीस्टॅक योजना ई पिक पाहणी योजना बेनीफिसरी सत्यापन ॲप बाबत  मार्गदर्शन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत एडगाव मंडळ या ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आला सदर कार्यक्रमास मा श्री एस.एस.सुतार नायब तहसीलदार (निवडणूक) उपस्थित राहून मार्गदर्शन केले. तसेच विविध दाखले वाटप करण्यात आले.

# धन्यवाद